# देगलूर महाविद्यालयात मतदार जनजागृतीसाठी सेल्फी पॉइंट

देगलूर (प्रतिनिधी) :-

अडत व्यापारी शिक्षण संस्था सचंलित देगलूर महाविद्यालय देगलूर येथे नांदेड लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीमध्ये मतदानाचे प्रमाण ७५ टक्के करण्याचे ध्येय समोर ठेवून देगलूर तहसील कार्यालयातील स्वीप कक्ष आणि देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाद्वारे विविध उपक्रम राबविले जात आहेत.

समाज माध्यमांचे वाढते महत्व लक्षात घेऊन अनेक कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

नवतरुण व तरुणींना मतदानाचे महत्व लक्षात यावे या ऊदेशाने देगलूर महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये सेल्फी पॉईटचे आयोजन केले आहे . आज तरुण मतदारावर सोशल मीडियाचा प्रभाव हा जास्त दिसत आहे.

सोशल मीडियाच्या माध्यमातून मतदान प्रक्रियेत सहभागी होता यावे या उद्देशाने सेल्फी पॉईंट निर्माण करण्यात आला आहे.

नांदेडचे जिल्हाधिकारी मा. अभिजीत राऊत आणि उपजिल्हाधिकारी श्री सचिन गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली देगलूर तालुक्यामध्ये स्वीप कक्षामार्फत विविध उपक्रम राबविली जात आहेत. देगलूर महाविद्यालयात प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप कक्षप्रमुख डॉ. बालाजी कतुरवार डॉ. अनिल चिद्रावार, डॉ. नीरज उपलंचवार डॉ. संजय देवडे आणि डॉ. संतोष येरावार परिश्रम घेत आहेत.

Scanned with OKEN Scanner